# नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२४ मधील

## <u>निशाणी क्र. ५१ वरील आदेश</u>

**CNR No. MHRT050002272024**

सदरचा अर्ज हा वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ४–ड मुकुंद पांडुरंग सुतार यांच्या वारसांची नावे लिहिण्यासाठी मूळ दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी सादर केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादी यांनी मयत प्रतिवादी ४–ड च्या वारसांची नावे नमूद केली आहेत.

**०२.** इतर प्रतिवादींकरीता विधाज्ञ श्री.ए.एस.भोसले यांनी औपचारीकरित्या प्रस्तुत अर्जावर म्हणणे देऊन अर्ज फेटाळण्याची विनंती केली. वादी यांचा मयत प्रतिवादी ४–ड च्या वारसांना दाव्यात सामील करुन घेण्यासाठीचा अर्ज निशाणी ५३ मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्याचे कोणतेही कारण नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.५१) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.01.29 17:01:11 +0530

**(संजय मो. चव्हाण)**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खेड**

**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

**दिनांक – २७.०१.२०२५**

# नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२४ मधील

## निशाणी क्र. ४९ वरील आदेश

**CNR No. MHRT050002272024**

सदरचा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र. ४–ड मुकुंद पांडुरंग सुतार यांचा मृत्यु झाल्यानंतर मुदतीत वारस अभिलेखावर आणण्यास १३९ दिवसांचा विलंब झाल्याने सदरचा विलंब माफ करून मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४–ड मुकुंद पांडुरंग सुतार यांचा मृत्यू दि.१०.०९.२०२४ रोजी झाल्यानंतर १२ दिवसांपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या मृत्यूची नोंद झालेली नव्हती. त्यानंतर वादी यांनी ग्रामपंचायत कार्यालयाकडे मृत्यूच्या दाखल्यासाठी संपर्क केला असता त्यांनी मृत्यूची नोंद झाली नसल्याचे सांगितले. पुन्हा ते ग्रामपंचायत कार्यालयाकडे गेले असता सदर मृत्यूचा दाखला हा त्यांच्या वारसांना देता येईल असे सांगून वादी यांना देण्यास नकार दिला. सदरचा विलंब हा वादीच्या निष्काळजीपणामुळे झालेला नाही. सदर विलंब माफ न झाल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. तांत्रीक अडचण येऊ नये म्हणून प्रस्तुतचा विलंब माफीकरिता अर्ज वादी यांनी दाखल केला आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविले. प्रतिवादीतर्फे वकीलांनी सदरचा अर्ज हा वादी यांनी केवळ जाणून बुजून विलंब केलेला असून सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांना मान्य नाही. तसेच योग्य ती कॉस्ट लावून सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** दोन्ही पक्षाच्या वकीलांचा प्रस्तुत अर्जावर युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ४–ड हे मयत झाले आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांना प्रतिवादी क्र. ४–ड चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता विलंब झाला आहे. त्याबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिले असून ते पटण्यासारखे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषांवर चालवून अंतिमरित्या निकाल होण्यासाठी मदतच होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार वादी यांना प्रतिवादी क्र. ४–ड चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करुन तशी दुरुस्ती करणेची परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि.४९) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना प्रतिवादी क्र. ४–ड चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.01.29 17:01:17 +0530

**(संजय मो. चव्हाण)**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खेड**

**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

**दिनांक – २७.०१.२०२५**

# नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२४ मधील

## <u>निशाणी क्र. ५३ वरील आदेश</u>

### CNR No. MHRT050002272024

सदरचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ४–ड मुकुंद पांडुरंग सुतार यांचे वारस अभिलेखावर आणण्यास परवानगी मिळावी म्हणून सादर केला आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४–ड मुकुंद पांडुरंग सुतार यांचा दि.१०.०९.२०२४ रोजी मृत्यू झाला असून त्यांना कुंदा मुकुंद सुतार, अवधुत मुकुंद सुतार, मिलींद मुकुंद सुतार व सोनाली मुकुंद सुतार हे वारस आहेत. सदरच्या मूळ दाव्यात दुरुस्ती केल्यास मूळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, वादी यांनी त्यांना वारस म्हणून दाव्यात सामील करुन घेण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविले. प्रतिवादीतर्फे वकीलांनी योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली.

**०४.** प्रस्तुत विचाराधीन अर्जातील कथनांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता असल्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ४–ड च्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन घेणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यांना दाव्यात समाविष्ट करुन न घेतल्यास त्यांच्या हक्कसंबंधावर बाधा येऊ शकते व त्यांच्याशिवाय सदरचा दावा हा गुणवत्तेवर निकाली होणार नाही. सबब, सदरचा अर्ज हा मंजूर करण्यास पात्र आहे. करीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.५३) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना प्रतिवादी क्र. ४–ड चे वारस अभिलेखावर आणण्यास परवानगी देण्यात येते. त्याप्रमाणे त्यांनी वादपत्रात आवश्यक ती दुरुस्ती

चौदा दिवसांच्या आत करुन घ्यावी.

३. दावा दुरूस्ती केल्यानंतर दाव्याची दुरूस्त प्रत या न्यायालयास व पर्यायाने विरुध्द पक्षास पुरविणेची आहे.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.01.29 17:01:24 +0530

**(संजय मो. चव्हाण)**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खेड**

**दिनांक – २७.०१.२०२५**

**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order below Exh. 95,97,99 in Case No. | : | RCS No. 34/2024 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 27.01.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 27.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 29.01.2025 |